


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख १ मे १९४६ अंक १८

## दि विजय टेक्स्टाइल्स लिमिटेड

—येरंडवणा, पुणें ४—

अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल
रु. १,००,०००

भरणा झालेलें भांडवल
रु. ३४,५००

सदर भांडवल २५ रुपयांच्या २००० ऑर्डिनरी शेअर्समध्यें आणि ५० रुपयांच्या ६ टके दराच्या १००० प्रेफरन्स शेअर्समध्यें विभागण्यांत आलें आहे.

—मॅनेजिंग एजंटस—
महा–कवडीकर आणि कंपनी

सदर कारखान्यांत नित्योपयोगी सुती कापड तयार होतें

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.,

—: पुणें शहर :—

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, खोपोली, ओझर ( जि. नाशिक )

एकूण खेळतें भांडवल रु. ४० लाखांचेवर

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. के. व्ही. केळकर, M. A., LL. B. ( अध्यक्ष ) | श्री. बी. बी. वाळवेकर, M. L. A. ( उपाध्यक्ष ) |
| श्री. वि. वि. वर्तक | श्री. डी. डी. देशपांडे, B. E. ( Ele. & Mech. ) |
| शेट गोवर्धनदास विठ्ठलदास | श्री. के. बी. साळवेकर |
| सौ. इन्दुमतीबाई फडके, B. A. ( Hons. ) | श्री. बी. पी. केळकर |
| शेट वाडीलाल साकळचंद | श्री. बी. बी. भाजेकर, B. A., B. Com., LL. B. |
| श्री. एम्. एन. परांजपे, B. Sc. | श्री. के. पी. जोशी |

( गतवर्षी ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें आहे. )

* मुंबई, नगर, नासिक, बँगलोर, असींकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.—

रा. बा. साळवेकर, B. A., LL. B. } मॅनेजिंग
नि. ना. क्षीरसागर } डायरेक्टर्स

## —: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

**रोटीचें रॅशनिंग**—ग्रेट ब्रिटन रोटीचें रॅशनिंग करण्यास तयार आहे, परंतु अमेरिकेनेंहि तसें केलें पाहिजे, असें ब्रिटिश सरकारनें कंबाइंड फूड बोर्डाला कळविलें आहे.

**रशियाचा प्रचंड कार्यक्रम**—रशियाच्या पंचवार्षिक कार्यक्रमाप्रमाणें, तेथील राष्ट्रीय उत्पन्न १९५०. सालीं युद्धापूर्वीच्या ३० ज्यास्त व १९१३ च्या साडेआठपट होईल अशी योजना आहे. युद्धापूर्वीच्या मानानें मजुरींत १५०% भर पडेल.

**बनावट रोखे**—ब्रिटिश सरकारचे युद्धकर्जाचे कांहीं रोखे बनावट करण्यांत आले असल्याचें आढळून आलें आहे. गुप्त पोलीस खात्याकडे हें प्रकरण सोपविलें आहे.

**" भांडवलशाहींत एकदम बदल नको "**—" अँग्लो-अमेरिकन राष्ट्रांत रूढ असलेली सध्याची व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांतील भांडवलशाही पद्धत हिंदुस्थानांत चालू आहे. त्याच पद्धतीनें कांहीं काळ व्यवहार करणें हिंदुस्थानास हितावह होईल. भरपूर विचार केल्याविना तीमध्यें बदल करूं नये. राज्यकारभारांत सध्याप्रमाणेंच इंग्रजी भाषा चालू ठेवावी. प्रांतांमध्यें दोन भाषा असण्यास हरकत नाहीं. "—सर एम. विश्वेश्वरअय्या.

**पश्चिम गोलार्धाची शिरगणति**—पश्चिम गोलार्धांतील सर्व देशांमधील लोकांची १९५०सालीं शिरगणति करण्यांत यावयाचा आहे. शिरगणतीचा तपशील ठरविण्यासाठी त्या गोलार्धांतील देशांच्या प्रतिनिधींची एक बैठक १९४७ किंवा १९४८ मध्यें भरेल.

**टाटा क्वार्टर्ली**—टाटा सन्स लि. तर्फे प्रसिद्ध होत असलेल्या वरील त्रैमासिकाचा एप्रिल १९४६ चा अंक प्रसिद्ध झाला आहे. त्यांत हिंदुस्थानचें स्टर्लिंग पौंडांतील येणें व जानेवारी-मार्चचें आर्थिक समालोचन हे विषय असून तुलनात्मक माहितीच्या आकड्यांचे नकाशे व तक्ते देण्यांत आले आहेत.

**कै. शं. गो. देवधर**—मुं. प्रां. सहकारी बँकेचे मॅनेजर श्री. शं. गो. देवधर ह्यांचे निधनानिमित्त दुखवट्याची सभा बँकेच्या संगमनेर शाखेंत ता. २५।४।४६ रोजीं श्री. तात्यासाहेब संत वकील ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाली.

ता. १७ एप्रिलच्या अंकांतील " कै. शं. गो. देवधर " हा लेख मुं. प्रांतिक सहकारी बँकेच्या पालघर शाखेचे इन्स्पेक्टर श्री. खं. म. खंडागळे ह्यांनीं लिहिलेला आहे.

**मि. हूवर**—माजी अमेरिकन प्रेसिडेंट, मि. हूवर हे आपला जागतिक दौरा संपवून ता. १० रोजीं अमेरिकेस परत जातील. तेथें पोचल्यावर सबंध अमेरिकाभर हिंडून ते अन्नवचतीच्या मोहिमेस पोषक भाषणें करतील. हिंदुस्थानांतून बँकॉक, शांघाई, नानकिंग ह्यामार्गें ते अमेरिकेकडे जातील.

**ग्रामोद्योगासंबंधीं विचारविनिमय**—ग्रामोद्योगांच्या वाढीसंबंधीं मुंबई सरकारशीं चर्चा करण्याकरितां अ. भा. ग्रा. संघाचे तज्ज्ञ श्री. जव्हेरभाई पटेल हे मुंबई येथें दाखल झाले आहेत. अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचेपुढें ते आपली योजना मांडतील.

**विम्याचें राष्ट्रीयकरण**—फ्रेंच विमा कंपन्यांवर राष्ट्रीय मालकी नियंत्रण लादणारें बिल तेथील विधिमंडळानें मंजूर केलें आहे.


डोंगरे याच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात

घोडा छाप शाईच्या पुड्या
दाणेकर कंपनी मुंबई २८.




अखिल निलगिरी
हवा शुद्धि कारक
एरंडेल वापरा
लक्ष्मी एजन्सी
मुंबई २८




सांडू
प्रेग युटेरो
गरोदर स्त्री व गर्भ यांस पोषक
द. सू. सांडू ब्रदर्स चेंबूर लिमिटेड (चेंबूर मुंबई)

पुणें चीफ एजंटसः—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें

फाऊंटन पेनकरितां
लोटस
शाई
सर्वत्र मिळते.

पंढरीनाथ ब्रिलिअन्टाईन वापरा



# आयुर्विमा-कायद्यांतील दुरुस्त्यांचें बिल

मध्यवर्ती विधिमंडळाच्या नुकत्याच संपलेल्या उन्हाळ्याच्या अधिवेशनांत, विमा-कायद्यांत दुरुस्त्या करूं पहाणाऱ्या बिलाचा मसुदा सभासदांच्या विचारासाठी त्यांच्या समितीकडे सोपविण्यांत आला. ही समिति सिमला येथें ऑगस्टमध्यें एकत्र येऊन, नोव्हेंबरच्या अधिवेशनांत समितीच्या शिफारशीसह मसुदा विधिमंडळापुढें मांडला जाईल असें वाटतें. विमा कंपन्यांच्या कारभाराबाबत कांहीं अनिष्ट प्रकार सरकारच्या नजरेस १९४५ च्या प्रारंभीं आणण्यांत आले. तेव्हां या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सर कावसजी जहांगीर यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमण्यांत आली. सदर कमिटीनें जो अहवाल सादर केला त्यांत मुख्यतः दोन मुद्यांवर जोर देण्यांत आलेला आहे. (१) कांहीं आपमतलबी भांडवलवाल्यांनीं विमा कंपन्यांवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला; विमा कंपन्यांच्या पैशाचा उपयोग जुगारा-सारख्या आर्थिक व्यवहारांत होऊं लागलेला दिसूं लागला. (२) विमा-कंपन्या व बँका यांच्या संचालक मंडळावर तेच तेच संचालक दिसूं लागले. अशा प्रकारच्या व्यवहारांत विमेदारांच्या पैशाला धोका उत्पन्न होण्याचा संभव असल्यानें वरील सारले प्रकार शक्यतोंवर अशक्य करण्यासाठी या नवीन विमाविषयक बिलाचा जन्म झालेला आहे.

विम्याचें काम करणाऱ्या एजंटांना, अगर एजंट नेमून त्यांच्याकडून विम्याचें काम मिळविणाऱ्या चीफ एजंटांसारख्यांना मोबदला म्हणून कमिशन देण्याची पद्धत आहे. विमा-कंपन्यांना धंदा चालविण्यासाठी जो खर्च करावा लागतो त्यांत बराच मोठा भाग कमिशनचा असतो. विमा कंपन्यांच्या खर्चाच्या प्रमाणावर नियंत्रण घालणारीं कलमें नवीन बिलांत असल्यामुळें कमिशनच्या मोबदल्यावरही कमी अधिक नियंत्रण ठेवणें ओघानेच आलें. कंपन्यांच्या भांडवलाच्या तपशीलासंबंधीं एका कलमान्वयें असें ठरविण्यांत येणार आहे कीं, कोठल्याही आयुर्विमा कंपनीचे शेअर्स हे ऑर्डिनरी असून शिवाय त्यांची दर्शनी किंमतही एकच असली पाहिजे. शिवाय प्रत्येक भागीदाराचा कंपनीच्या वसूल भांडवलांत ज्या प्रमाणांत हिस्सा असेल त्याच प्रमाणांत त्याला मतदानाचा हक्क प्राप्त झाला पाहिजे. कंपनीच्या वसूल भांडवलांत जरूर ती भर न घालतां 'डिफर्ड' भाग काढण्याची अनिष्ट प्रथा अलीकडे निर्माण होत होती; त्यामुळें कंपनीच्या व्यवहारावर कांहीं गटांचाच संपूर्ण ताबा निर्माण होण्याची शक्यता होती. तसें होऊं नये म्हणून हें कलम घालण्यांत आलें आहे. याच कलमाप्रमाणें भागांच्या खरेदी-विक्रीसंबंधीं नियंत्रण घालण्यांत आलें आहे. या नवीन नियंत्रणाप्रमाणें भाग खरेदी करणाराकडून त्याचा अखेरचा मालक कोण आहे याबद्दल माहिती मागविण्यांत येणार आहे आणि भाग खरेदी करणाराच्या नांवावर जर वसूल भांडवलाच्या १० टक्क्यांपेक्षा अधिक भांडवल होणार असेल तर अशा खरेदीला मध्यवर्ती सरकारची आगाऊ परवानगी घ्यावी लागेल. बँका अगर पैसे गुंतविणाऱ्या कंपन्या यांच्याबाबत ही मर्यादा ५ टक्के ठेवण्यांत आलेली आहे. विमा-कंपन्यांवर निवळ पैसे गुंतविणाऱ्या कंपन्यांची पकड बसूं नये असा या कलमाचा हेतु आहे. विमा-कंपन्यांच्या पैसे गुंतविण्याच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक नवीन कलम घालण्यांत आलें आहे. विमा-कंपन्यांजवळ दीर्घ मुदतीपर्यंत न लागणारा असा पैसा असतो. त्यामुळें थोडी जोखीम पत्करून पैसे गुंतविण्याचा मोह होण्याचा संभव असतो. त्याचप्रमाणें कर्जे देण्याच्या बाबतींतही हात सढळ होण्याची शक्यता असते. या प्रकारांना आळा घालून विमेदारांच्या पैशाची सुरक्षितता वाढविण्यासाठी धोक्याच्या ठिकाणीं पैसे गुंतविण्यास कंपन्यांच्या चालकांना वाव असतां कामा नये. हें करण्यासाठी विमा-अधिकाऱ्याला जरूर तर पैसे गुंतवितांना अमुकच तऱ्हेने गुंतवा असें सांगण्याचा अधिकार देण्यांत यावयाचा आहे. या शिवाय सर्व गुंतवणुकी गहाण, अग्रहक्क वगैरेपासून पूर्णपणें मुक्त असल्या पाहिजेत असें ठरविण्यांत आलें आहे.

कंपन्यांचे पैसे डिबेंचर्स व प्रेफरन्स शेअर्स यांत गुंतवणें असेल तर त्या दुसऱ्या कंपनीने तत्पूर्वी ५ वर्षे व्याज दिलेलें असलें पाहिजे. ऑर्डिनरी भागांत रक्कम गुंतवणें असेल तर त्या कंपनाने ४ टक्के नफा तत्पूर्वी ७ वर्षेपर्यंत दिलेला असला पाहिजे. स्थावर मालमत्तेच्या गहाणावर मालमत्तेच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक कर्ज दिलें जाऊं नये आणि पॉलिसीवरील कर्जें रोख किंमतीच्या रकमेच्या आंतच असलीं पाहिजेत अशा प्रकारचे निर्बंध सुचित करण्यांत आलेले आहेत. तथापि संचालक मताच्या मतैक्यानें पैसे गुंतविले गेले असतील तर या निर्बंधापासून कंपनीला बाध येणार नाहीं. मात्र तसें असेल तर त्यासंबंधी माहिती मध्यवर्ती सरकारला ७ दिवसांच्या आंत दिली पाहिजे.

सध्याच्या विमाकायद्याच्या २७ व्या कलमांतील पोट कलम (१) मध्यें जी रक्कम उल्लेख केलेली आहे त्याच्या एक टक्क्याच्या १/१० इतकीच रक्कम कोठल्याही विमा कंपनीला बँका अगर पैसे गुंतविणाऱ्या कंपन्यांत गुंतवितां येईल किंवा ज्या कंपनींत विमा-कंपनी आपले पैसे गुंतवील त्या कंपनीच्या विकल्या गेलेल्या भांडवलाच्या २ टक्क्यांपेक्षा अधिक ही रक्कम असतां कामा नये असा पर्याय ठेवण्यांत आलेला आहे. या निर्बंधांतून रिझर्व्ह बँक व इंपिरिअल बँक यांना मात्र वगळण्यांत आलें आहे. इतर कंपन्यांचीं डिबेंचर्स अगर शेअर्स यांच्याबाबत हीच मर्यादा विकल्या गेलेल्या भांडवलाच्या १० टक्के ठेवण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें विमा कंपनीच्या आयुर्विमा-फंडाच्या फक्त ३ टक्के येवढीच रक्कम बँकांकडे ठेव म्हणून ठेवण्यास परवानगी असावी आणि त्या ठेवीची मुदतही एक वर्षापेक्षा अधिक असूं नये असें सुचविण्यांत आलें आहे. विमा-कंपन्यांच्या पैसे गुंतविण्याच्या व्यवहारावर नजर ठेवून अनिष्ट प्रकार टाळण्यासाठी दर वर्षाच्या मार्च, जून, सप्टेंबर व डिसेंबर अखेरच्या यासंबंधीच्या व्यवहारांचा तक्ता पाठविण्याची सक्ती करण्यांत येणार आहे. हे तक्ते दर तिमाहीनंतर १५ दिवसांच्या आंत पाठवावयाचे आहेत.

विमा कंपन्यांच्या दैनंदिन संचालकाला कमिशन अगर मूल्यमापनांतील फायद्याच्या वाट्याच्या रूपाने मोबदला देण्यांत येऊं नये अशा अर्थाचें एक कलम आहे. हें कलम दुरुस्त कायदा अंमलांत आल्यानंतर दोन वर्षांनीं लागू व्हावयाचें आहे. विमा कंपन्यांच्या संचालकाला आपल्या मागून येणाऱ्या संचालकाचें नांव सुचविण्याचा अधिकार असूं नये असा निर्बंध घालण्यांत आला आहे. एका विमा कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरला अगर अधिकाऱ्याला दुसऱ्या विमा कंपनीचा अगर बँकेचा अगर पैसे गुंतविणाऱ्या कंपनीचा एकाच वेळीं मॅनेजिंग डायरेक्टर अगर अधिकारी रहातां येणार नाहीं. विमा कंपन्यांच्या संचालक मंडळाच्या सभासदांत बदल झाल्यास तो बदल एक महिन्याच्या आंत दोन वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केला गेला पाहिजे; अशीं इतरही कांहीं कलमें आहेत.

सर्व जगांत त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतही खाजगी आर्थिक व्यवहाराच्या आघाडीवर अधिक अधिक नियंत्रणें बसूं लागलीं आहेत. आयुर्विमा-व्यवसाय व बँकिंगसंबंधीं मध्यवर्ती विधिमंडळांत आलेलीं बिलें याच प्रवृत्तीचीं द्योतक आहेत.

# स्फुट विचार

## जागतिक अन्नधान्य-परिस्थिति

जागतिक अन्नधान्य परिस्थितीची पाहणी करण्यासाठी प्रे. ट्रूमन यांनीं नेमलेले मि. हूवर हिंदुस्थानांत आले होते. त्यांचा दौरा आतां संपला असून त्याची फलश्रुति म्हणून तात्पुरत्या व तातडीच्या म्हणून सहा शिफारशी प्रे. ट्रूमन यांच्याकडे धाडण्यांत आल्या आहेत. (१) एप्रिल, मे जून आणि जुलै या महिन्यांत दरमहा ११ लाख टन गहूं निर्यात करावा. (२) युरोपमधील ज्या देशांतून दरडोई दर दिवशीं ३०० ग्रॅमपेक्षां अधिक पाव दिला जात असेल, त्या देशांतून ३०० ग्रॅम इतकाच देण्यांत यावा. (३) ब्रिटननें आपल्या जवळ असलेल्या अन्नधान्याच्या सांठ्यापैकीं ५ लाख टन धान्य बाहेर देशास पाठविण्याची तयारी करावी. (४) अर्जेंटायना, अमेरिका व कानडा यांनीं दक्षिण अमेरिकेला पाठविण्यांत येणाऱ्या अन्नधान्याच्या निर्यातींत पुढील चार महिने ४० टक्के इतकी कपात करावी. (५) रशियानें जागतिक अन्नधान्याच्या सांठ्याला मदत म्हणून दरमहा ३ लाख टन धान्य अधिक द्यावें. येते चार महिने आणीबाणीचे आहेत, तेवढ्यापुरतीच ही मागणी करण्यांत येत आहे. (६) फॅसिस्ट राष्ट्रांपासून मुक्त केलेल्यांत जीं लहान राष्ट्रें आहेत त्यांना अन्नधान्याचा पुरवठा आधीं करण्यांत यावा. मि. हूवर यांचे मदतनीस मि. मेसन यांच्या मतानें, वरील उपाययोजना करण्यांत आली तर पुरवठा व अन्नधान्याची जरूरी यांपैकीं ९० टक्के तूट भरून येणें शक्य आहे. मि. हूवर यांच्या अंदाजाप्रमाणें उपासमार टाळण्यासाठी जितक्या धान्याची जरूरी आहे त्यापेक्षां ५० लाख टन धान्य कमी पडत आहे. हिंदुस्थानांत जून महिन्यांत ३ लाख २० हजार टन अन्नधान्य आयात झालें पाहिजे, त्यापैकी १ लाख ७ हजार टन धान्य वाट चालूं लागलें आहे असें मि. हूवर यांनीं एका मुलाखतींत सांगितलें.

## लवाद मंडळाचा एक महत्त्वाचा निर्णय

अलिकडे हिंदुस्थानांतहि इतर देशांप्रमाणें संपाची साथ आलेली दिसत आहे. कंपन्यांचे चालक व संपवाले यांच्यांत तडजोडीचा मार्ग म्हणजे लवाद-मंडळाचा निर्णय मान्य करण्याची उभय पक्षांची कबुली. संपवाल्यांच्या मागण्या अमान्य करतांना कंपन्यांतर्फे नेहमीं असें सांगण्यांत येतें कीं कंपनीला या मागण्यांचा खर्च परवडत नाहीं. अशा परिस्थितींत संपवाल्यांच्या ट्रेड-युनिअनच्या प्रतिनिधींना कंपनीचीं हिशेबाचीं पुस्तकें पाहण्याचा अधिकार आहे किंवा नाहीं यांचें उत्तर "नाहीं" असें आतांपर्यंत देण्यांत आलेलें आहे, परंतु स्कॉटिश लीगल हेल्थ ॲश्युरन्स कंपनीच्या टायपिंग करणाऱ्या मुलींच्या संपाबाबत सर जॉन फॉर्स्टर यांनीं दिलेल्या निकालामुळें वरील उत्तराबद्दल संशय उत्पन्न झाला आहे. सर जॉन फॉर्स्टर यांनीं असा निकाल दिला कीं कंपनीला परवडत नाहीं हें म्हणणें संपवाल्यांच्या प्रतिनिधींना खोडून काढतां आलें नाहीं, म्हणून त्यांच्या मागण्या मान्य करतां येत नाहींत. कांहीं वर्षांपूर्वी कापड-गिरणी-कामगारांच्या एका युनिअननें असा मुद्दा काढला होता कीं, कंपन्या जेव्हां बँका अगर प्राप्तीवरील कराच्या बाबतींत व्यवहार करतात तेव्हां त्यांना आपलीं हिशेबाचीं पुस्तकें दाखवावीं लागतात. मग संपवाल्यांना तोच अधिकार कां नसावा? इंग्लंडच्या राष्ट्रीय लवाद-मंडळावरील एक लवाद या नात्यानें मि. फॉर्स्टर यांनीं जो निकाल दिला आहे त्यामुळें ट्रेड-युनिअनवाले व कारखानदार कंपन्या वगैरेंत खळबळ उडाली आहे.

## इंटर नॅशनल बँकेच्या कार्यास प्रारंभ

इंटर नॅशनल बँकेच्या गव्हर्नरांची बैठक सॅव्हना येथें कांहीं आठवड्यांपूर्वी भरली होती. आतां त्या बँकेची सर्व पूर्व तयारी संपली असून कर्जाचे अर्ज स्वीकारण्यास लवकरच प्रारंभ होईल. सहा महिन्यांचे आंत प्रत्यक्ष कर्जें मिळवून देण्यास सुरवातहि होईल. युद्धामुळें नाश पावलेल्या विभागांची पुनर्घटना करण्यासाठी व नवे धंदे काढण्यासाठी मदत करणें हें इंटर नॅशनल बँकेचें काम आहे. हिंदुस्थानातर्फे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर चिंतामणराव देशमुख सॅव्हना येथील बैठकीस उपस्थित होते. हिंदुस्थान सरकारनें बँकेचें सभासदत्व पत्करलें असलें तरी त्यास मध्यवर्ती असेंब्लीची अद्याप मान्यता मिळालेली नाहीं. रशियाच्या गैरहजेरीमुळें हिंदुस्थानास त्याची बँकेवरील जागा मिळाली आहे. ब्रेटन वुडस करारांतून निष्पन्न झालेल्या इंटर नॅशनल बँक व मोनेटरी फंड ह्या संस्थांत दाखल व्हावयाचें किंवा नाहीं, ह्याचा रशिया अद्याप विचार करीत आहे. रशिया मागाहून सभासदत्व पत्करो वा न पत्करो, हिंदुस्थानास मिळालेली कायमची जागा टिकून राहिली पाहिजे, हें त्याच्या महत्त्वाच्या दृष्टीनें न्यायाचेंच ठरेल.

## फ्रान्स आपल्या सर्व सोन्यास मुकणार

फ्रान्स अमेरिकेकडून माल आयात करीत आहे. त्याची किंमत देण्यासाठी बँक ऑफ फ्रान्सच्या तिजोरीमधील सोनें उपयोगांत आणलें जात आहे. सध्याप्रमाणेंच अमेरिकन मालाची फ्रान्समध्यें आयात चालू राहिल्यास १९४६ अखेर फ्रान्सजवळ एक तोळासुद्धां सोनें शिल्लक उरणार नाहीं असें फ्रेंच तज्ज्ञ म्हणत आहेत. बँक ऑफ फ्रान्सच्या ताळेबंदांत दाखविण्यांत येणारें सोनें कमी झालें म्हणजे फ्रेंच चलनाचा सोन्याचा आधार त्या प्रमाणांत नष्ट होईल. त्याचा लोकमतावर अनिष्ट परिणाम होण्याची फ्रेंच सरकारला भीति वाटत आहे. बँक ऑफ इंग्लंडच्या ताळेबंदांत आज कित्येक वर्षे चलनास तारण म्हणून फारच थोडें सोनें दाखविण्यांत येत आहे. तथापि, एक्सचेंज स्टॅबिलायझेशन फंडांत ब्रिटिश सरकारनें सोन्याचा साठा ठेवलेला आहे आणि ह्या फंडावर त्या सरकारची मालकी आहे. त्यामुळें, ब्रिटिश चलनास सोन्याचा फारसा आधार नसला तरी लोकमतावर त्याचा परिणाम झालेला नाहीं. बँक ऑफ फ्रान्समधून बाहेर पडणारें सोनें विदेशी घेणेकऱ्यांच्या पदरांत पडत आहे आणि वर्षअखेर फ्रान्सजवळील सोनें संपुष्टांत येण्याचा संभव आहे. ह्या घटनेस फ्रान्समध्यें शक्यतों अवास्तव प्रसिद्धी मिळूं नये, अशी फ्रेंच सरकार दक्षता बाळगीत आहे.

## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

वरील बँकेचें वसूल भांडवल २,०२,६०० रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड सुमारें ४ लक्ष रुपयांचे आहेत. खेळतें भांडवल १ कोटि, ९० लक्ष रुपये आहे. १९४५ सालीं बँकेस १ लक्ष, ७९ हजार रुपये नफा झाला. पहिल्या सहामाहीसाठी ऑर्डिनरी शेअरला २ रु. ८ आ. इंटेरिम डिव्हिडंड देण्यांत आलें होतें. दुसऱ्या सहामाहीस १२½% डिव्हिडंड जाहीर झालें आहे. १०० रुपयांच्या ऑर्डिनरी भागाचे ४० रुपये वसूल करण्यांत आलेले आहेत. १½% बोनसहि देण्यांत आला आहे. इनकम टॅक्स व सुपर टॅक्स ह्यांच्यासाठी १ लक्ष, २० हजार रुपयांची तरतूद केली आहे. नोकरवर्गास दोन महिन्यांच्या पगाराइतका बोनस दिला आहे. ना. बॅ. रा. ब. बामणे हे बँकेचे चेअरमन आहेत. मॅनेजर डॉ. एस. आर. शिरगांवकर हे प्रकृतिस्वास्थ्यासाठी १ जानेवारीपासून निवृत्त झाले. श्री. व्ही. ए. सावंत हे ॲक्टिंग मॅनेजर म्हणून काम करीत आहेत.

## रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटा व त्यांचें तारण

१९—४—४६

| | रु. |
|---|---|
| इश्यू खात्याची जिंदगी = एकूण चलनी नोटा | |
| अ. सोनें व सोन्याचीं नाणीं:— | |
| हिंदुस्थानांतील सांठा | ४४,४१,४५,००० |
| हिंदुस्थानाबाहेरील सांठा | ... |
| स्टर्लिंग रोखे | ११,२५,२२,८९,००० |
| अर्धी बेरीज | ११६९,७४,३४,००० |
| ब. रुपयाचीं नाणीं | १९,३७,७३,००० |
| हिं. सरकारचे रुपयांतील रोखे | ५७,८४,०५,००० |
| हुंड्या व इतर पतपत्रिका | ... ... ... |
| एकूण जिंदगी (चलनी नोटांची एकूण रक्कम) | १२,४६,९६,१२,००० |

### लॉर्ड केन्स ह्यांचा मृत्यु

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व महत्त्वाचे, ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ लॉर्ड केन्स हे गेल्या आठवड्यांत वयाच्या ६२ व्या वर्षी आकास्मिकपणें मरण पावले. इंडिया ऑफिसमध्यें त्यांनीं दोन वर्षें काम केलें होतें व १९१३ सालीं नेमण्यांत आलेल्या चेंबर्लेन (करन्सी) कमिशनचे ते एक सभासद होते. "इंडियन फिनॅन्स अँड करन्सी" हा त्यांचा ग्रंथ सुप्रसिद्ध आहे. जागतिक अर्थकारणांतील त्यांची कामगिरी अतिशय मोठी आहे. त्यांच्या मृत्यूमुळें केवळ इंग्लंडचेंच नव्हे, तर सबंद जगाचें फार नुकसान झालें आहे.

### अ. भा. सहकारी परिषदेंत दि. ब. काजी ह्यांचें भाषण

सहाव्या अखिल भारतीय सहकारी परिषदेचें अधिवेशन गेल्या आठवड्यांत दिवाण बहादूर काजी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं लखनौ येथें पार पडलें. सहकारी चळवळीमधील सहकारी अधिकाऱ्यांचें अंग कमी करण्याचें महत्त्व त्यांनीं प्रतिपादन केलें. सभासदांतील जबाबदारीची जाणीव वाढली पाहिजे, असें ते म्हणाले. परिषदेस ब्रिटिश मंत्रिशिष्टमंडळापैकीं सर स्टॅफर्ड क्रिप्स व मि. ॲलेक्झँडर ह्यांनीं संदेश पाठविले होते.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें

(स्थापना १९३५)

अधिकृत भांडवल रु. ५०,००,००० खपलेलें भांडवल रु. २५,००,०००

जमा भांडवल रु. १२,५०,००० रिझर्व्ह व इतर फंड रु. ३,००,०००

एकूण खेळतें भांडवल रु. १,७०,००,०००

—यांच्यातर्फें—

नव्या उपयुक्त कार्याचा आरंभ

# दि महाराष्ट्र बँक एक्झिक्यूटर ॲण्ड ट्रस्टी कं., लि.

स्थापना १० एप्रिल (रामनवमी) १९४६

## अधिकृत भांडवल रु. ५,००,०००

### जरूर तें भांडवल बँक ऑफ महाराष्ट्रच भरणार

बँकेने आपल्यापैकीं खालील डायरेक्टरांची नवीन कंपनीचे डायरेक्टर्स म्हणून नेमणूक केली आहे.

(१) श्री. धों. कृ. साठे, (२) श्री. वा. पु. वर्दे, (३) श्री. न. ग. पवार, (४) श्री. फ. दो. पदमजी, (५) श्री. मा. वि. शहा

या नव्या संस्थेतर्फें सर्वस्वीं बँक ऑफ महाराष्ट्राच्याच नियंत्रणानें व अधिकृत व्यवस्थेनें व्यवस्थापत्र, इच्छापत्र (Wills), विश्वस्तपत्र वगैरेचीं कामें विश्वस्त म्हणून किंवा एक्झिक्यूटर म्हणून केलीं जातील.

★ बँकेसंबंधींचे व्यवहार व्यक्तीच्या (खातेदाराच्या) साक्षात अधिकारानें होतात तर या नव्या योजनेंत व्यक्तीच्या अनुपस्थितींत किंवा पश्चातहि तिच्या इस्टेटीसंबंधींचे व्यवहार तोच विश्वास ([illegible]) संभाळून बँकेच्या नेहमींच्या पद्धतशीर रीतीनें केले जातील.

★ विश्वस्तपत्रानें किंवा अन्य तऱ्हेनें या नव्या व्यवस्थेचा उपयोग करून घ्यावयाचा असेल त्यांनीं विशेष माहितीकरितां मॅनेजर, दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. यांचेकडे चौकशी करावी.

सी. व्ही. जोग, मॅनेजर.

# महाराष्ट्रापुढील कांहीं आर्थिक प्रश्न

( १ )

लेखकः—श्री. बळवंत पांडुरंग पेंडसे, बी. ए. ( ऑनर्स ), बी. कॉम.; सर्टि. ए. आय. आय. बी.

युद्ध संपून एक वर्ष पुरें होतें न होतें तोंच हिंदुस्थानांत व विशेषतः महाराष्ट्रांत अन्न अपुरें पडणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. उद्योगधंदे आर्थिक इलाखीमुळें डबघाईस येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. हिंदुस्थान सरकारनें व मुंबई सरकारनें शेती व उद्योगधंदे यासंबंधीं आर्थिक योजना प्रसिद्ध केल्या. आपले योजनांचा खोल अभ्यास करून त्यापैकीं अत्यंत जरूरीच्या कोणत्या आहेत याविषयीं आपले विचार सरकारपुढें मांडले पाहिजेत व त्यास पूरक अशा कोणत्या योजना हातांत घ्याव्या याचाही विचार झाला पाहिजे. या दृष्टीनें थोडेसें दिग्दर्शन या लेखांत करण्याचा विचार आहे.

महाराष्ट्रांत पावसाची अनिश्चितता असल्यामुळें कालव्याचें काम तावडतोब हातीं घेण्याची फार आवश्यकता आहे. तसेंच विद्युच्छक्ति कोठें उत्पन्न करतां येईल, याचा खोल अभ्यास विचारवंतांनीं करणें जरूर आहे. विद्युच्छक्तीमुळें शेतीचें उत्पन्न वाढेल व लहानसहान उद्योगधंदे भरभराटीस येतील व लोकांचे हातांत चार पैसे जास्त खेळतील.

## मुंबई सरकारच्या योजना

ऑगस्ट १९४४ मध्यें मुंबई सरकारनें "मुंबईच्या खेडेगांवच्या सुधारणेची योजना" या नांवाचें एक १६ पानी चोपडें प्रसिद्ध केलें व १५ वर्षांत ५० कोट रुपये खर्च करून खेडेगांवें सुधारण्याची योजना आखली. नंतर १५ मार्च १९४५ रोजीं एक ७० पानांचें चोपडें प्रसिद्ध करून सुमारें १००–१५० योजना पुढें मांडल्या आहेत. या सर्व योजना एकदम अंमलांत आणणें शक्य नाहीं तरी त्यापैकीं कांहींची निवड होणें प्राप्त आहे. पुस्तकांत दिलेल्या क्रमांकानेंच आपण त्यांचा विचार करूं.

## शेतकीविषयक योजना

योजना १८ ते २२ ( बीं–बियाणांची वाढ व प्रसार ):—शेतकऱ्यांस उत्तम बियाणें कसें मिळेल याची काळजी असते. या योजनेमुळें त्यांस बीं उत्तम मिळेल व शेतीपासून अधिक धान्य निर्माण होईल.

योजना ४८ व ४९—खतांचे पुरवठ्यासंबंधीं.

योजना ८१—दुष्काळी जमिनींची सुधारणा करण्यासंबंधीं योजना. बांध घालणें, जमिनींचे निरनिराळे उतार करणें, जंगलें वाढविणें व पडित जमीन लागवडीखालीं आणणें या बाबी येतात.

योजना ८२—जेथें पाऊस जास्त पडतो तेथें जास्त जमीन लागवडीखालीं आणण्याची योजना.

योजना ३—जनावरांची सुधारणा करण्यासंबंधीं योजना.

योजना ५३—कोंबडीं व बदकें यांचे पैदाशीची योजना.

## जंगलांची वाढ

या झाल्या शेतकीविषयक योजना. आतां आपण जंगलविषयक योजनांचा विचार करूं. ज्या प्रमाणांत जास्त जंगलें असतील त्या प्रमाणांत पाऊस जास्त पडतो. जंगलापासून इमारतींचें व जळणाचें लाकूड मिळतें.

योजना ५८–जंगलें वाढविण्यासंबंधीं योजना. ही योजना युद्धसमाप्तीनंतर तावडतोब अंमलांत आणावयाची आहे.

## कालवे

यानंतर महत्त्वाची योजना म्हणजे कालव्यासंबंधींची होय. महाराष्ट्रांत दुष्काळी प्रांत बरेच असल्यामुळें त्यांचा या योजनांमुळें फायदा होण्यासारखा आहे. एकंदर २२ योजना असून त्यापैकीं मध्यविभागांत खालीलप्रमाणें १२ आहेत.

| योजना नं. | योजना | जिल्हा | अदमासें खर्च ( लक्ष रुपये ) |
|---|---|---|---|
| ७ | वीर धरण | पुणें, सोलापूर | १६७ |
| ८ | खडकवासला धरण | पुणें | २१५ |
| ९ | गंगापूर धरण व हायड्रो इलेक्ट्रिक वर्क्स | नाशिक, नगर | ८२ |
| १० | गिरणा योजना | खानदेश | ४०० |
| ११ | मूळा योजना | नगर | ३१६ |
| १२ | तिसंगीतलाव ( निरा राईट बँक कॅनॉल नं. ३ चे मागें) | सोलापूर | २० |
| १३ | मांवडी तलाव ( निरा राईट बँक कॅनॉलचे मागें ) | " | ९ |
| १४ | चणकापूर धरण वाढविणें व गिरणा कालव्याचा साठा जास्त करणें | नाशिक | ५ |
| १५ | सामगांव तलाव | पुणें | २ |
| १६ | व्हिक्टोरिया तलाव | पुणें | २.४ |
| १७ | मंगी तलाव | सोलापूर | ९.५ |
| १८ | सपाटणें तलाव | " | ३.७ |

या सर्व योजनांना १९ कोट रुपये खर्च येईल. महाराष्ट्रांत पावसाची अनिश्चितता असलेमुळें कालव्याचीं कामें तावडतोब हातीं घेण्याची आवश्यकता आहे.

## वीज पुरवठा

यापुढील महत्त्वाचा प्रश्न म्हणजे वीजपुरवठ्याचा. मुंबईत वीजपुरवठ्याचीं ६५ लायसेन्स आहेत. त्यापैकीं ३ मोठ्या प्रमाणावर वीज पुरवण्यासंबंधीं आहेत. या बाबतींत सरकारी धोरणाचे उद्देश पुढीलप्रमाणें आहेत.

( १ ) जेथें नैसर्गिक अनुकूलता असेल तेथें जास्ती प्रमाणावर वीज उत्पन्न करणें.

( २ ) कमी दरांत व जास्त प्रमाणांत लोकांना—विशेषतः खेडेगांवच्या–वीज उपलब्ध करून देणें. पहिले प्रथम भंडारदरा–राधा व भाटघर येथील वीजपुरवठ्याची वाढ करणें व नंतर या योजनेचा दुसरा भाग म्हणजे काली नदी व कोयना येथें जलशक्तीवर चालणारीं विद्युत्गृहें उभीं करणें.

या सुधारणेकरतां मुंबई सरकारनें एक फंड निर्माण केला व तो १९४५ अखेर ८९ कोटींपर्यंत गेला. वर दिलेल्या योजनांपैकीं अत्यंत निकडीच्या कोणत्या आहेत याचा विचार झाला पाहिजे. तरी मुंबई सरकारास आमची अशी नम्र विनंति आहे कीं, दर तीन महिन्यांनीं कोणत्या योजना हातीं घेतल्या, त्यांवर किती खर्च केला, कोणत्या योजनांची व भागाची सरकारनें पहाणी केली इत्यादि गोष्टींचा तपशील असलेलें चोपडें सरकारनें प्रसिद्ध करावें.

---

**एक हजाराखालील विम्यास बंदी**—एक हजार रुपयांखालील रकमेचे विमे स्वीकारण्याची हिंदुस्थानांतील सर्व विमा कंपन्यांस १९४६ च्या विमा दुरुस्ती कायद्यानें बंदी केली आहे. २० मार्च रोजीं हा कायदा अंमलांत आला.

**मोनेटरी फंड व बँक ह्यांची वर्गणी**—इंटर नॅशनल मोनेटरी फंड व इंटर नॅशनल बँक ह्यांची वर्गणी देण्याचें हिंदुस्थान सरकारनें शक्य तितकें लांबणीवर टाकावें असें मध्यवर्ती असेंब्लीच्या समितीनें सरकारास सांगितलें आहे. ह्यासंबंधींतील अखेरचा निर्णय घेण्याची वेळ आली, तर समितीची सभा बोलावण्यांत यावयाची आहे. स्टर्लिंग शिलकांच्या बाबत ब्रिटिश सरकारनें अद्याप कांहींच खुलासा केलेला नसल्याकारणानें हें धोरण अवलंबविण्यांत येत आहे.

**ग्वाल्हेर बँक लि.**—वरील बँकेच्या कामास १० एप्रिल रोजीं प्रारंभ झाला. शेठ डालमिया हे बँकेचे चेअरमन आहेत.

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

वर्ग पुस्तकें बंद

स्वदेशी मिल्स १२–४–४६ } ४–५–४६ }

इंडि. युना. मिल्स ३-५-४६ ते ३१-५-४६.

व्याज–वजा

इंडि. यु. ऑ. ०–१५–० दि. १०–६–४५

इंड. यु. डि. ०–३–० दि. १०–६–४५

नागपूर रु. ५ दि. ३०–४–४६

स्वदेशी रु. २२ दि. १५–५–४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २३।४।४६ | बुधवार २४।४।४६ | गुरुवार २५।४।४६ | शुक्रवार २६।४।४६ | सोमवार २९।४।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९–८–९ | आगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २९०५—० | २९१५—० | २९०३–१२ | २९२७—८ | २९६७—८ |
| ४८०; ३७२ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५२१—८ | ५२१—० | ५१६—८ | ५२१—० | ५२६—८ |
| २२२२-८; १७६३-१२ | ५०–०–०S | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २३९०—० | २४१०—० | २४२०—० | २४४६—४ | २४४०—० |
| ७०२; ५६६ | १९——०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ८९०—० | ९०७—० | ९३०—० | ९४७—० | ९५७—० |
| ६६८; ५०७ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ७७९—० | ७७१—० | ७८३—० | ८१६—० | ८३५—० |
| ४४३–८; ३६० | ५–०–०† | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ४८२—० | ४८१—० | ४८३—० | ४८९—० | ४९७—० |
| ३४२–०; २७५ | १५–०–० | मार्च | फिनले | १०० | ४०९—० | ४०९—० | ४०५—० | ४१२—० | ४२१—० |
| ३३५; २८३-८ | ८–०–०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३७०—० | ३६९—० | ३७०—० | ३७२—० | ३७८—० |
| ३३७; २४३ | ४–०–०† | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४०२—० | ३९८—० | ३९९—८ | ४०६—८ | ४२५—० |
| ५; ३-११-० | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ५—८—६ | ५—८ | ५—७—६ | ५—८ | ५–१० |
| १७-१०; १३-७-० | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २१— १४ | २१–११–६ | २१—१५ | २२—३ | २३—० |
| ३-१०; २-९ | ०–३–० | मे | ,, डिफर्डस् | १ | ४—२—६ | ४—२ | ४—१—६ | ४—२ | ४—४ |
| ७९०; ६४५ | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ८३५—० | ८१३–१२ | ९००—० | ९२७—८ | ९४२—८ |
| २४३–८; २०६-८ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २५५—० | २५४—० | २५३—४ | २५२—० | २५४—८ |
| २५६; २१३-८ | ८–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २८६—० | २९४—० | २९३—० | २९५—० | ३०६—० |
| ५९२-८; ५१०-० | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे चर्मा | १२५ | ६५०—० | ६५०—० | ६४७—८ | ६५१—४ | ६६०—० |
| ४३-७; ३०-१२ | ०–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४२—० | ४३—० | ४२—८ | ४३—१ | ४४—० |
| | | | ३½% रोखे | १०० | १०२–१५ | १०२—१३ | १०२–१३ | १०२–१३ | १०२-१३-६ |

सोमवार दि. २९–४–४६ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०१—८ | बरोडा | २०४–८ | आंध्रा व्हॅली | १८५०–० | अलकॉक | ५७५–० |
| १९५१–५४ | १०२–१–६ | सेंट्रल | १२९–० | बॉम्बे ट्रॅम | १६०–४ | बॉंबे स्टीम | ७४०–० |
| १९५७ | १०२—८ | इंडया | २५३–० | टाटा हायड्रो | २२०–० | न्यू इंडिया | १३२–० |
| १९५९–६१ | १०२—७ | इंपी० { | २६९०–० | टाटा पॉवर | १९६७–८ | शिवराजपुर | ५९–० |
| १९६३–६५ | १०२–११ | | ७०२–८ | | | टाटा केमिकल | २८–११ |
| १९६६–६८ | १०२—६ | रिझर्व्ह | १६४–० | | | टाटा ऑइल | १२७–८ |
| १९७०–७५ | १०२—६ | युनियन | १६–४ | | | | |

**श्री. आपटे ह्यांची निवडणूक**—रूरल प्रॉडक्टस कं. लि चे मॅ. डायरेक्टर श्री. न. गं. आपटे ह्यांची ऑल इंडिया फ्रूट प्रिझर्व्हस असोसिएशनच्या कार्यकारी समितीवर महाराष्ट्रातर्फे निवडणूक झाली आहे.

**बॉंबे सेल्स टॅक्स नियम**—बॉंब सेल्स टॅक्स नियमांच्या मसुद्याच्या प्रती उपलब्ध नव्हत्या, ह्यासाठी त्या मसुद्यावरील आक्षेप लोकांनीं पाठविण्याची मुदत आतां १५ मेपर्यंत लांबविण्यांत आली आहे.


## पूना कमर्शिअल हायस्कूल

सरकारमान्य असलेला व्यावहारिक व उपयुक्त असा एस. एल. सी. परीक्षेचा कोर्स. परीक्षा पास झाल्यावर कॉमर्स कॉलेजांत निश्चित प्रवेश. देशी व इंग्रजी पद्धतींचा जमाखर्च, टाईपरायटिंग, शॉर्ट हँड इत्यादि विषय.

व्यापारी वर्गाचे व धंदेवाईक वर्गाचे विद्यार्थ्यांसाठीं तसेंच इतरही विद्यार्थ्यांस अत्यंत उपयोगी असा अभ्यासक्रम. इंग्रजी ३ री पास झालेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश.

—विशेष माहितीसाठीं समक्ष भेटावें—

**वर्ग जूनपासून सुरू होतील**

पत्ता:—२५७ क, बुधवार पेठ, डॉ. भिडे यांचा वाडा.

**डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्सचें ऑफिस**




+ दोन सौंदर्य प्रसाधनें +




पुणें—सिटी पोस्टासमोर. मुंबई—गिरगांव व काळबादेवी

ओलक ] फाफ मशिनच्या तोडीचीं [ ओलक

ओलक शिवण्याचीं यंत्रें

रोखीनें अगर हप्त्यानें मिळतात.

लिहा अगर भेटाः—व्ही. आर. बापट,
ओलक माशिन कं., लकडी पुलाजवळ,
लक्ष्मीरोड, पुणें नं. २

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.


एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २७७२८

पैसा आणि ज्ञान वाढवा !

श्रीमंत कसें व्हावें !—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल ! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.

—आजच लिहा—

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

विनचूकच्या माहितीनें

स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.

किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—

भायखळा पुल, मुंबई नं. २७.

पूना स्टॉकिस्ट : सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.

—— इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत : ——





हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.